12:42:12 नियमित दिवाणी दावा १५६/२०१५

नामदेव किसन पाटील वि. सखाराम तुकाराम बंगे वगैरे
नि.नं. ४५ /लगत / सी

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १ तर्फे वकील श्री. व्ही. वाय. पाटील यांच्यामार्फत शपथेवर सुरु,</u>**

७. दावा मिळकतीचा गट क्र. १३१६ असा आहे. त्याचे क्षेत्र ९ गुंठे आहे. गट क्र. १३१६ च्या चतुःसिमा मला सांगता येतील. त्याच्या पूर्वेला माने यांची प्रॉपर्टी आहे, पश्चिमेला देखील माने यांची प्रॉपर्टी आहे, दक्षिणेला आपलीच जमीन आहे, उत्तरेला रस्ता आहे. दावा मिळकतीचे मूळ मालकांची नावे मला सांगता येतील. त्यांची नावे म्हणजेच शिवाजी शंकर सांगावकर, तुकाराम रामा जाधव अशी आहेत. मी दावा मिळकत सन २०१५ मध्ये खरेदी केली होती. मी सदर जमीन तुकाराम रामा जाधव यांच्या वारसांकडून खरेदी केली होती. त्यांच्या वारसांचे नाव गंगुबाई तुकाराम जाधव, कल्पना युवराज पाटील व संजय तुकाराम जाधव अशी आहेत. मी ज्यावेळी जमीन खरेदी घेण्याअगोदर त्याची सरकारी मोजणी झाली नव्हती. मी जमीन खरेदी घेतल्यानंतर त्याची सरकारी मोजणी करून घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर वारसांनी मला जमीन घेतेवेळी चतुःसिमेसह कोणते क्षेत्र माझे आहे ते दाखविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी सखाराम तुकाराम बंगे यांना मी पूर्वीपासून ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ यांची जमीन सदर दावा मिळकतीच्या दक्षिण बाजूला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खरेदी केलेल्या दावा मिळकतीच्या खरेदीपत्रामध्ये दक्षिण बाजूस सखाराम तुकाराम बंगे यांची जमीन आहे. सदर खरेदीपत्र दाव्यात हजर करायला मला अडचण नव्हती.

प्रश्न – सदर खरेदीपत्र दाव्यात का हजर केले नाही याचे कारण तुम्ही सांगू शकता का ?

उत्तर – मला आठवत नाही.

८. (साक्षीदारास नि.४५ वरील कागदपत्र दाखविण्यात आले.) हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिज्ञापत्रामध्ये परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केलेला संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा लिहीलेला आहे.

प्रश्न – दस्त हजर केला नसताना सुद्धा सदर मजकूर तुम्ही प्रतिज्ञापत्रामध्ये का नमूद केला त्याचे कारण तुम्हांला सांगता येईल का ?

उत्तर – तो मजकूर बरोबरच आहे म्हणून तो टाइप करण्यात आलेला आहे.

९. हे म्हणणे खरे नाही की,मी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामधील सर्वच लिहीलेला मजकूर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सत्य वस्तुस्थिती कोर्टासमोर येवू नये म्हणून तो दस्त मी दाव्यात हजर केलेला नाही. गट क्र. १३१६ चा पूर्ण इतिहास मला माहीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्ञानू रामा जाधव या दावा मिळकतीमध्ये निम्म्या हिश्याचे मालक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ज्ञानू रामा जाधव यांचा अर्धा हिस्सा शिवाजी शंकर सांगावकर यांनी विकत घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, शिवाजी सांगावकर यांनी दावा मिळकतीमधील ३.२ गुंठे हे क्षेत्र रस्त्यासाठी सखाराम बंगे यांना दिलेले होते. प्रतिवादी क्र. १ यांनी जे क्षेत्र खरेदी केले आहे ते सन २००८ साली किंवा कसे त्याची तारीख मला माहीत नाही. जे प्रतिवादी यांनी क्षेत्र खरेदी घेतले त्या खरेदीपत्राचा दस्त क्र. २१४२/२००८ असा आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. त्याच्या मोबदल्यात प्रतिवादी क्र. १ यांनी २६८ मधील जे क्षेत्र आहे ते शिवाजी शंकर सांगावकर यांना दिलेले आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. दावा मिळकतीमधील मी घेतलेले क्षेत्र मला माहीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत क्र. १३१६ आहे त्या मिळकतीच्या उत्तरेला कोल्हापूर सोनुर्ले हायवे रस्ता जातो. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. १३१६ मधील मी क्षेत्र घेण्याच्या अगोदर निम्म्या पेक्षा जास्त क्षेत्र हे रस्त्याकरिता हायवेला गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी मी क्षेत्र खरेदी घेतले त्यावेळी त्या क्षेत्राचा ताबा न घेता नुसतेच त्याचे रजिस्टर खरेदीपत्र झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, क्षेत्र पूर्णपणे रस्त्यात गेल्यामुळे आम्ही घेतलेले खरेदी क्षेत्र हे तेथे अस्तित्वात नाही.

प्रश्न – तुमचे क्षेत्र त्या ठिकाणी शिल्लक आहे याबद्दलचा कोणताही कागदोपत्री पुरावा तुम्ही या कामात हजर केलेला नाही ?

उत्तर – असा प्रश्न बरोबर नाही आम्ही खाजगी मोजणी करून घेतलेली आहे.

१०. दावा मिळकतीचा सातबारा उतारा मी पाहिलेला आहे. सदर सातबारा उतारा मी या कामी हजर केलेला आहे. (साक्षीदारास नि. ६ दाखविण्यात आले.) हे म्हणणे खरे आहे की, सदर सातबारा उतारामध्ये सखाराम तुकाराम बंगे यांच्या नावाची नोंद आहे, त्याच्या पुढे क्षेत्र ५ आणे ९ पै. असे नमूद आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर नोंदीप्रमाणे प्रतिवादी यांची दावा मिळकतीमध्ये मालकी व कब्जेवहिवाट आहे.

प्रश्न – प्रतिवादी क्र. १ यांनी सन २००८ मध्ये जे क्षेत्र खरेदी घेतले आहे त्याच्या पूर्वेस माने यांची मिळकत, पश्चिमेस प्रतिवादी क्र. २ यांची मिळकत, दक्षिणेस प्रतिवादी क्र. १ यांची गट क्र. २६८ ची मिळकत, उत्तरेस कोल्हापूर नांदगाव रस्ता आहे ?
उत्तर – हे म्हणणे खरे नाही.

११. मी दाव्यात वर्णन केलेले शब्द प्रतिवादी मला केव्हा म्हणाला त्याची तारीख, वार व वेळ मला आठवत नाही. प्रतिवादी याने दावा मिळकत वाटप करून देण्यास मला नकार दिला त्याची तारीख, वार व वेळ मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. २६८ व उत्तरेला असलेला हायवे रस्ता याच्यामध्ये असलेल्या जागेमधून प्रतिवादी हे सदर जागेचा जाणे येणेकरिता वापर करतात. हे म्हणणे खरे नाही की, या न्यायालयात माझे बरेच सिव्हील लिटीगेशन पेंन्डीग आहेत.
प्रश्न – प्रतिवादी यांनी सन २००८ मध्ये घेतलेल्या ३.२ गुंठयाशी तुमचा काहीही संबंध नाही ?
उत्तर – त्या गटाशी माझा संबंध नाही.

प्रश्न – प्रतिवादी यांनी सन २००८ मध्ये घेतलेल्या ३.२ गुंठयाशी तुमचा कोणताही वाद नाही ?
उत्तर – आम्ही गट क्र. १३१६ हे क्षेत्र वाटणी होवून मिळण्याकरिता या न्यायालयात आलेलो आहे.

१२. गट क्र. १३१६ संपूर्ण क्षेत्र मला हवे असे नाही.  हे म्हणणे खरे आहे की, नि. ४५ चे प्रतिज्ञापत्र माझ्या वकील साहेबांनी तयार केले.  हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रतिज्ञापत्र तयार करतेवेळी मी वकिलांना माहिती दिली नव्हती.  हे म्हणणे खरे नाही की, १३१६ मध्ये ४.५ गुंठे हे क्षेत्र अस्तित्वात नसताना सुद्धा मी खोटे खरेदीपत्र तयार करून घेतलेले आहे.   हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदीपत्राच्या आधारे प्रतिवादी सखाराम तुकाराम बंगे यांना त्रास देण्यासाठी सदरचा खोटा दावा दाखल केलेला आहे.  हे म्हणणे खरे नाही की,  मी नि.४५ चे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे ते मी खोटे दाखल केलेले आहे.

**उलटतपास प्रतिवादी क्र. १ तर्फे पुर्ण.**

**उलटपतास प्रतिवादी क्र. २ यांची कैफियत दाखल नसल्यामुळे त्यांचे तर्फे उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला.**

**सबब, उलटतपास प्रतिवादी क्र. ३ यांचेकरिता पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

13:30:59

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

**( के. दि. काकतकर )**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा

पन्हाळा

दि.  २३/०७/२०२६.